# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०९/०४/२०१८

## माओवादयांनी पेरून ठेवलेले ०२ भुसुरूंग निकामी

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोमके मुरूमगांव येथील पोलीस मदत केंद्रापासून साधारणत: १ कि.मीच्या अंतरावर पोलीसांना जीवे मारण्याच्या उद्देशाने व मोठा घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने माओवादयांनी दोन भुसुरूंग पेरून ठेवले होते. काल दिनांक ०८/०४/२०१८ रोजी सायंकाळी सदर बाब गोपनिय सुत्रांकडुन समजल्यानंतर पोमके मुरुमगाव पोस्टेचे अधिकारी व कर्मचारी तसेच सी.आर.पी.एफ. ११३ बटालियन व एस.आर.पी.एफ. गट क्रं. ७ चे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी शोध घेतला असता मुरुमगावातील बाजाराकडे जाणाऱ्या रोडवर सामान्य नागरीक राहात असलेल्या ठिकाणी घातपाताच्या दृष्ठीने माओवादयांनी दोन भुसुरूंग पेरुन ठेवल्याचे लक्षात आल्याने सामान्य नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर जागा संरक्षित करुन गडचिरोली येथील बॉम्ब शोधक पथकास पाचारण करण्यात आले.

आज सकाळी ०७.३० ते ०८.१५ वा. दरम्यान बॉम्ब शोधक पथक गडचिरोली येथील अधिकारी/कर्मचारी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी धानोरा श्री. रणजित पाटील यांचे उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली मुरूमगांव पोस्टेचे अधिकारी व कर्मचारी, सी.आर.पी.एफ. ११३ बटालियन व एस.आर.पी.एफ. गट क्रं. ७ चे अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने

घटनास्थळावरून अंदाजे प्रत्येकी १० ते १५ किग्रॅ. वजनाचे ०२ भुसुरूंग जमिनीतुन बाहेर काढुन सुरक्षित ठिकाणी नेवून त्यांचा स्फोट घडवून निकामी करण्यात यश आले.